2014

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ )

ISSN : 2277-8721)

Impact factor:0.987

VOL - III

ISSUES - III

Bi-Monthly

**Chief-Editor:** Ubale Amol Baban

**Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)**
Bi-monthly
Vol III Issues III
Reviewed Journal

ISSN 2277-8721

May-June 2014

# भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादी चळवळ : एक चिकित्सक अभ्यास

**प्रा.सुनिल एकनाथ बिराजदार**
श्री शिवाजी महाविद्यालय, उमरगा

**प्रस्तावना :**

जगाच्या राजकारणाचा विचार केला तर आपला देश अलिप्ततावादी चळवळीच पुरस्कर्ता होता. कारण तेंव्हा आपल्याला स्वातंत्र्य मिळाले त्या काळापासून आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये अलिप्ततावादाची पाठराखण केली. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाने जे विशिष्ट वळण घेतले होते. त्यातूनच पुढील काळात अलिप्ततावादी चळवळीचा उगम झाला.

भारताच्या दृष्टीने अभिमानाची बाब म्हणजे, भारत हा या चळवळीचा प्रणेता आणि संस्थापक सदस्य आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्टे म्हणून अलिप्ततावादाचा पुरस्कार केला आणि या धोरणाला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात व्यापक मान्यता मिळाली. जगातील अनेक राष्ट्रांनी विशेषत: विकसनशील राष्ट्रांनी अलिप्ततावादाचा अंगीकार केला. पुढे या राष्ट्रांनी एकत्र येऊन काही समान उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी अलिप्ततावादी चळवळ (Non Aligned Movement - NAM) ची स्थापना केली. यामध्ये भारत, इजिप्त, इंडोनेशिया आणि युगोस्लाव्हीया या देशाची भुमिका महत्त्वाची होती. त्यामुळेच सदर उपरोक्त विषयाची निवड करून शोधनिबंध तयार करण्याचा संशोधकाचा मानस आहे.

**शोधनिबंधाचे शिर्षक :**

भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादी चळवळीचा चिकित्सक अभ्यास.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. भारताची परराष्ट्र धोरण समजुन घेणे.
2. अलिप्ततावादी चळवळीचा इतिहासाची माहिती करून घेणे.
3. आंतरराष्ट्रीय धोरणामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्व जाणुन घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध लिहण्याची द्वितीय माहितीचा (Secondary Data) वापर केला असून यामध्ये संदर्भ ग्रंथ, दैनिक वृत्तपत्रातील लेख, मासिके, इन्टरनेट इ. सामुग्रीचा आधार घेतला आहे.

**अलिप्ततावाद चळवळीची पार्श्वभुमी :**

ही चळवळीचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणात निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करणे आवश्यक वाटते. कारण दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका आणि रशिया या देशाचा महासत्ता म्हणून उदयास आली. जगाची विभागणी अमेरिकाच्या नेतृत्वाखाली भांडवलशाही लोकशाही राष्ट्राचा गट आणि रशियाच्या नेतृत्त्वाखाली साम्यवादी राष्ट्राची दोन परस्पर विरोधी गटात झाली. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात दोन महासत्तानी शह-काटशहाचे डावपेच होऊ लागले. अमेरिकेने साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी रशिया भोवती आपल्या मित्र राष्ट्राची फळी उभा केली. जगातील निरनिराळ्या राष्ट्राशी लष्करी करार घडवून आणले. त्यामधूनच नाटो, सिएटो, सेंटो यासारख्या लष्करी कराराचा जन्म झाला. दुसऱ्या बाजुला रशियाने पुर्व युरोपातील साम्यवादी राष्ट्रांना एकत्र आणून त्यांच्याशी वॉर्सा यामुळे शितयुध्दाची परिस्थिती निर्माण झाली आणि जग युध्दाच्या उंबरवट्यावर येऊन ठेपले.

**भारताचे तत्कालिक परराष्ट्र धोरण :**

या चळवळीची सुरूवात भारत, इजिप्त, इंडोनेशिया, युगोस्लाव्हीया या देशाच्या प्रयत्नातून झाली. पं. जवाहरलाल नेहरू, इजिप्तचे अध्यक्ष गमाल नासर, इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकोर्णो आणि युगोस्लाव्हीयाचे

मार्शल टिटो यांनी 1955 बाडूंग येथे परिषद घेऊन जगात शांतता निर्माण व्हावी याकरिता महत्त्वाचे अलिप्ततावादाची भुमिका मांडण्याचे कार्ये या परिषदेमध्ये झाली आणि या चळवळीचे बिजारोपण झाले.

अलिप्ततावादाची खरी सुरूवात इ.स. 1961 बेलग्रेड परिषदेपासून झाली आणि जगातील 25 राष्ट्रांनी या परिषदेत सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय राजकारणात एक स्वतंत्र गट म्हणून कार्य करण्याचा निर्णय या परिषदेत झाला. वसाहतवाद व साम्राज्यवाद यांना विरोध, शांततामय सहअस्तित्ववर विश्वास इ. ठराव या परिषदेत संमत केले आणि जागतिक शांततेसाठी अलिप्ततावादी चळवळीचा उद्दिष्ट सर्वानुमते ठरवण्यात आले.

**अलिप्ततावादी चळवळीचे उद्दिष्टे :**

1. जागतिक राजकारण कोणत्याही सत्ता गटात किंवा लष्करी करार संघटनेत सहभागी न होता आपला अस्तित्व कायम टिकवणे.
2. पाश्चात्य भांडवलशाही - लोकशाही राष्ट्रे आणि साम्यवादी राष्ट्रे या दोन गटातील तणाव दूर करणारी शक्ती म्हणून कार्य करते.
3. आंतरराष्ट्रीय राजकारणामधील शीतयुध्दाचे वातावरण बदलण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणात सक्रीय सहभाग घेणे.
4. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी शांततेला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे.
5. निरनिराळ्या राष्ट्रामधील वादग्रस्त प्रश्न शांततेच्या व वाटाघटीच्या माध्यमातून सोडवले जावेत. याकरिता मध्यस्थाची भुमिका स्विकारून संबंधित राष्ट्रांना विचार विनिमयासाठी एकत्र आणण्यात पुढाकार घेणे.
6. जगातील विकसनशील राष्ट्रांनी आपल्या आर्थिक विकासासाठी एकत्र प्रयत्न करण्यासाठी पुढाकार घेणे, तसेच विकसिनशील राष्ट्रात मैत्री परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागणे.

**सारांश :**

भारताचे स्वातंत्र्यप्राप्ती नंतर आपले परराष्ट्र धोरणाची भुमिका अलिप्ततावादी चळवळी अंहिसा या माध्यमाचे धोरण स्विकारून महासत्तेच्या विरोधात अलिप्ततावादाचे स्विकारून आपल्या परराष्ट्र धोरणाचा

पायडा पाडला आणि आजतागायत तेच धोरण चालु आहे. संपूर्ण जग भारताकडे एका विशिष्ट नजरेने लक्ष ठेवून आहे आणि एक महासत्ता असलेली लोकशाही राष्ट्र म्हणून उदयास येत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ :**


- Sukhbir singh, A History of political Thought, Meerut, 1966.
- डॉ.बी.पी.वर्मा : आधुनिक भारतीय राजनीतीक चिन्तन.
- डॉ.ज.रा.शिंदे, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
- डॉ.प्रशांत अमृतकर, आंतरराष्ट्रीय संबंध, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.